# प्रेसनोट

दिनांक ०६/०६/२०२२

**सह जिल्हा निबंधक, तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अलिबाग जिल्हा रायगड, यांचे विरूध्द यशस्वी लाचेची सापळा कारवाई**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| २. | पो.स्टे, दैनदिंनी नोंद क्र. | :- | अलिबाग पोलीस ठाणे, २५/२२:०८ दिनांक ०६/०६/२०२२ |
| ३. | आरोपीचे नाव हुद्दा वर्ग व कार्यालयाचा पत्ता | :- | लोकसेवक श्री. शैलेंद्र अर्जुन साटम वय ५२ वर्ष, सह जिल्हा निबंधक, तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अलिबाग जिल्हा रायगड राह. १०१, सोहम हेरिटेज, भक्ती मंदिर रोड, हरीनिवास सर्कल, पाचपाखडी ठाणे. |
| ४ | लाचेची मागणी रक्कम | :- | रू. ५,३०,०००/- लाचेची मागणी करून त्यापैकी रू. ३०,०००/-लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबूल केले |
| ५ | स्विकारली रक्कम | | रू. ३०,०००/- |
| ६ | थोडक्यात हकिगत | :- | यातील तक्रारदार यांचा कन्सल्टींग व्यवसाय असुन ते एमआयडीसीतील प्लॉटचे डॉक्युमेंट एज्युडीकेशन संबधीचे काम त्यांना प्राप्त अधिकार पत्रान्वये करीत असतात. तक्रारदार यांचेकडे एज्युडीकेशनच्या कामाकरीता आलेल्या तीन फाईल्स त्यांनी कलेक्टर ऑफ स्टॅम्प ऑफिस अलिबाग, येथे जमा केल्या होत्या तसेच त्या फाईल्सची ऑनलाईन फी भरून त्यास आवश्यक ते कागदपत्रे जोडुन संबधीत कार्यालयात जमा केल्या होत्या. त्या ०३ फाईलचे एज्युडीकेशन करणेकरीता कलेक्टर ऑफ स्टॅम्प ऑफीस अलिबाग येथील सहजिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी श्री.शैलेंद्र साटम यांनी प्रत्येक फाईल मागे फायनल ऑर्डर देण्यकरीता १५,०००/-रु असे एकुण ४५,०००/-रु लाचेची मागणी करीत असलेबाबतची तक्रार दिलेली होती<br>तकारीच्या अनुषंगाने दिनांक ०६/०६/२०२२ रोजी पंच साक्षीदार यांचे समक्ष केलेल्या लाचेच्या सत्यता पडताळणी दरम्यान यातील तक्रारदार यांचेकडुन नवीन सबमिट केलेली अॅग्रीमेंट फॉर जॉब वर्कची ०१ फाईलचे पुर्ततिकरीता लोकसेवक यांनी पाच लाख रूपये व पुर्वी जमा केलेल्या ०३ फाईल पैकी पुर्ण केलेल्या २ फाईल व पेंडीग १ फाईल अशी ३ एज्युडिकेशनच्या फाईलकरीता प्रत्येकी १०,०००/-रु या प्रमाणे ०३ फाईलचे रू ३०,०००/- अशी ०४ फाईल मिळुन एकुण ५,३०,०००/-रु लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्याअनुषंगाने दिनांक ०६/०६/२०२२ रोजी आयोजीत सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडुन एज्युडिकेशनच्या ०३ फाईल्सचे रूपये ३०,०००/- लाचेची रक्कम स्विकारली असता लोकसेवक यांना सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग, रायगड येथे २०:०२ वाजता ताब्यात घेण्यात आले आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहान करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकांविरूध्द तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.**

---

मार्गदर्शन अधिकारी :- मा.श्री.डॉ. पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

संपर्क पत्ता :- ला.प्र.वि.ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१

संकेत स्थळ :- **acbmaharashtra@mahapolice.gov.in**

ई मेल :- **spacbthane@ mahapolice.gov.in**

ऑनलाईन तकार

ॲप्लीकेशन :- **acbmaharshtra.net**

टोल फ्री नंबर :- १०६४

दुरध्वनी कंमाक :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४

व्हॉटसॲप कंमाक :- ९९३०९९७७००

**शिवराज बेंद्रे**
**पोलीस निरीक्षक**
ॲन्टी करप्शन ब्युरो नवी मुंबई

Scanned with CamScanner